मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 10 सप्टेंबर 2024 | पान- 1


# पिंपरी विधानसभेत “मशाल”

## महाविकास आघाडीचे जागावाटप : चिंचवड, भोसरी ‘तुतारी’ ला सोडणार

**पिंपरी | मनीषा थोरात- पिसाळ**

पिंपरी- महाराष्ट्रातील 288 विधानसभेच्या मतदारसंघापैकी पुणे जिल्ह्यातील पिंपरी हा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी (SC) राखीव आहे. सध्या होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूकीसाठी इच्छुकांची तयारी जोरदार सुरु आहे. मात्र पिंपरी विधानसभा शिवसेना उध्दव ठाकरे गटाला म्हणजे मशाली साठी सुटणार असल्याने तुतारीकडून तयारी सुरु असलेल्या इच्छुकांच्या स्वप्नांवर पाणी पडणार आहे.




पिंपरी मतदारसंघाची 2009 मध्ये निर्मिती झाली. राखीव असलेल्या पिंपरीचे पहिल्यांदा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अण्णा बनसोडे यांनी प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर 2014 मध्ये सर्वच राजकीय पक्ष स्वतंत्र लढले आणि शिवसेनेचे गौतम चाबुकस्वार निवडून आले. राष्ट्रवादीचे बनसोडे आणि भाजपच्या पाठिंब्यावर लढलेल्या आरपीआयच्या चंद्रकांता सोनकांबळे यांचा निसटता पराभव झाला. तर, 2019 मध्ये राष्ट्रवादीचे बनसोडे पुन्हा विजयी झाले. त्यांनी शिवसेनेच्या चाबुकस्वार यांचा पराभव केला. पराभव स्विकारून माजी आमदार गौतम चाबुकस्वार यांनी नागरिकांसाठी काम सुरुच ठेवले. परिसरातील महिलांसाठी विविध योजना, इतर घटकातील महिलांना सहकार्य असे त्यांचे कार्य सुरुच आहे. शिवसेनेच्या उध्दव ठाकरे गटाशी एकनिष्ठ राहून काम सुरु ठेवले. दर दुसरीकडे शिवसेनेचे शहराध्यक्ष सचिन भोसले यांनीही पिंपरी विधानसभेवर दावा केला आहे.

**स्वच्छ प्रतिमा अन् शब्दाचा पक्का उमेदवार हवाय**

कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचारात सामील असलेला उमेदवार आम्हाला नकोय. कामापुरते आणि निवडणुकीपुरते गोड बोलणारे उमेदवार खूप येतात. मात्र शब्दाचा पक्का उमेदवार आम्हाला हवा आहे. महापालिकेत किंवा शहरात कुठल्याही प्रकारच्या भ्रष्टाचारात त्याचे नाव नसले पाहिजे. परिसरासाठी चांगले व्हिजन त्याच्याकडे पाहिजे. फक्त उच्चशिक्षित असून चालणार नाही तर त्याच्या शिक्षणाचा उपयोग नागरिकांसाठी आणि परिसरासाठी झाला पाहिजे.

**पिंपरी विधानसभेत या परिसराचा आहे समावेश**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गाच्या दोन्ही बाजूच्या परिसराचा समावेश असलेला पिंपरी विधानसभा मतदारसंघ संमिश्र लोकवस्तीचा आहे. उच्चभ्रू असलेला निगडी, प्राधिकरण, शाहूनगर, संभाजीनगर, मध्यमवर्गीय असलेला आकुर्डी, पिंपरीगाव, मोरवाडी, संत तुकारामनगर, दापोडी, कासारवाडी, फुगेवाडी आणि झोपडपट्टी असलेला आनंदनगर, इंदिरानगर हा परिसर या मतदारसंघात येतो. शहरातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या कॅम्प परिसरही पिंपरीतच आहे.

सर्व राजकीय समीकरणे पाहता आगामी काळात अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या या मतदारसंघात तिकीट वाटपावरून महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी चांगलीच दमछाक होणार हे मात्र नक्की. असं असलं तरी युती आणि आघाडीचे आजी-माजी आमदार आणि इच्छुक उमेदवार हे युतीचा धर्म पाळत इमाने इतबारे पक्ष श्रेष्ठींचा आदेश पाळत काम करणार का? हे येणाऱ्या काळातच समजेल.

### पिंपरी विधानसभेसाठी इच्छुकांची रस्सीखेच

» राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांनी तयारी सुरू केली आहे. तसेच, स्थायी समितीच्या माजी सभापती सीमा सावळे यांनी महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही बाजुला फिल्डिंग लावली आहे. त्यांना पिंपरीतून सिंधी बांधव आणि राष्ट्रवादीतून काही वरीष्ठांकडून पाठींबा आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून गौतम चाबुकस्वार, अॅड. सचिन भोसले, तुतारी गटाकडून सुलक्षणा धर, देवेंद्र तायडे इच्छुक आहेत. तसेच भाजपाच्या तेजस्विनी कदम, बाळासाहेब ओव्हाळ यांच्या नावाचीही चर्चा सुरु आहे.

---

## महापालिकेच्या रुग्णालयात वॉर्डबॉयकडून दोघींचा विनयभंग

### थेरगाव येथील रुग्णालयात शनिवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

नातेवाईकांना घेऊन रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या मायलेकीचा वॉर्डबॉयने विनयभंग केला. ही घटना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या थेरगाव येथील रुग्णालयात शनिवारी (दि. ७) रात्री आठ वाजताच्या सुमारास घडली. रोहन बाळासाहेब कांबळे (वय २४, रा. पंचशीलनगर, पिंपळे निलख) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत चिंचवड येथे राहणाऱ्या ४२ वर्षीय महिलेने रविवारी (दि. ८) वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी



दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची नातेवाईक महिलेला एमआरआय करण्यासाठी थेरगाव येथील महापालिकेच्या रुग्णालयात शनिवारी रात्री आठ वाजताच्या सुमारास आणले होते. त्यावेळी फिर्यादी महिला व त्यांच्या मुलीच्या अंगाला स्पर्श करीत आरोपी रोहन कांबळे याने विनयभंग केला. वाकड पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## शहरात डेंग्यूचे 136, चिकनगुनिया 23, झिकाचे 6 रुग्ण

### रुग्णांपैकी 4 रुग्ण गर्भवती महिला, रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याने घरी सोडण्यात आले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात मागील तीन महिन्यात डेंग्यू आजाराचे 136 रुग्ण, चिकनगुनिया आजाराचे 23 रुग्ण व झिका आजाराचे 6 रुग्ण आढळून आले आहेत. या रुग्णांपैकी 4 रुग्ण गर्भवती महिला आहे. या रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याने त्यांना घरी सोडण्यात आलेले आहे. तसेच गर्भवती महिलांना झिका व डेंग्यू या आजाराची कोणतीही लक्षणे आढळून आल्यास जसे की, ताप, सांधेदुखी, डोळ्यांच्या मागे दुखणे इ. त्यांनी त्वरीत डॉक्टरांचा सल्ला व वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी असे वैद्यकीय विभागामार्फत आवाहन करण्यात आले आहे. डेंग्यू , चिकुनगुण्या व झिका आजारांच्या पार्श्वभूमीवर वैद्यकीय विभागामार्फत



“डेंग्यू मुक्त प्रत्येक आठवडा एक दिवस एक तास” या मोहिमेअंतर्गत शहरातील विविध महापालिका तसेच खासगी शाळेमध्ये, अंगणवाडीमध्ये व परिसरात साफसफाई करून डास उत्पत्ती स्थानके नष्ट करण्याची कार्यवाही करण्यात आली. तसेच विद्यार्थांमध्ये व नागरिकांमध्ये सोशल मिडीयाद्वारे तसेच हस्तपत्रिका वाटप करून जनजागृती करण्यात आली. पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांनी कोणत्याही प्रकारचा ताप व इतर डेंग्यू व इतर किटकजन्य आजाराची लक्षणे असल्यास त्वरित तज्ञांचा सल्ला घ्यावा असे आवाहन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केले आहे.

# गणेशोत्सवात विविध देखावे उभारुन सामाजिक प्रबोधनावर भर

## वैभवशाली परंपरा असलेल्या पुण्याच्या गणेशोत्सवाची शहरासह जगभरात मोठी उत्सुकता असते.

**पुणे | प्रतिनिधी**

वैभवशाली परंपरा असलेल्या पुण्याच्या गणेशोत्सवाची शहरासह जगभरात मोठी उत्सुकता असते. जगाला हेवा वाटेल असा गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात पार पडतो तो सामाजिक ऐक्याच्या भावनेतून. गणेशोत्सवात गणेश मंडळांकडून विविध माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले जाते. यंदाही असेच सामाजिक प्रबोधन केले जाणार आहे.

गणेशोत्सवात जिंवत देखाव्यांच्या माध्यमातून या वर्षात गाजलेल्या आणि शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या विषयांवर भाष्य केले जाणार आहे. तसेच विघातक कृत्यांवर टीकाटिप्पणी करून समाजाची कानउघडणीदेखील केली जाणार आहे. पुण्यासह देशभर गाजलेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणासह विविध सामाजिक विषयांवर जिंवत देखावे यावेळी सादर केले जाणार असल्याने त्याबाबत गणेशभक्तांमध्ये मोठी उत्सुकता आहे.



### गेल्या काही वर्षांत जिवंत देखाव्यांचा ट्रेंड लोकप्रिय

» ऐतिहासिक, पौराणिक तसेच सामाजिक देखाव्यांना अधिक मागणी असल्याचे जिवंत देखावे सादर करणाऱ्या कलाकारांकडून सांगण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांच्याशी संबंधित जिवंत देखाव्यांना अधिक पसंती प्रेक्षकांची मिळते. यासोबतच पर्यावरणरक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, राजकीय, सामाजिक, देशभक्तिपर प्रसंगांवर आधारित देखाव्यांना मोठ्या प्रमाणात मागणी असते. याला प्रेक्षकांची मोठी गर्दी होते. आता या विषयांसह 'स्त्री अत्याचार', 'पोर्शे कार अपघात', 'छत्रपती शिवाजी महाराजांची न्याय व्यवस्था', 'प्रतापगडाचा रणसंग्राम', 'रांझ्याचा बाबाजी पाटील', 'ते चार दिवस', आदी महत्त्वाच्या विषयांवर जिवंत देखावे यंदा सादर केले जाणार आहेत.

"जिवंत देखाव्यात १७ वर्षांपासून ते ७० वर्षे वयोगटातील कलाकार काम करतात. यंदा उत्तर प्रदेश राज्यातून काही कलाकार खास जिवंत देखाव्यात काम करण्यासाठी आलेले आहेत. पुण्यासह विदर्भातूनदेखील कलाकार काम करण्यासाठी दाखल झाले आहेत. ऐतिहासिक देखावे सादर केले जातात, परंतु त्याला जोड आधुनिकतेची दिलेली असते. स्त्री अत्याचार या विषयावर देखावा सादर केला असून यातून स्त्रीनेच आता स्वत: उभे राहून ते बंड करावे. कोणाच्या मदतीची वाट न पाहता तिनेच आता लढावे, असाही संदेश देण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभे केलेच पण ते रयतेसाठी सुराज्य होते. कोणी वाकडी नजर केली तर त्यांचे हात पाय कलम केले जात होते. तेच प्रकार आता घडत आहेत. पण त्याला शिक्षा कितपत होते, यावर भाष्य करणारे विषयांवर प्रकाश टाकला जातो. देखाव्यासाठी विषय निवडताना सामाजिक भान ठेवले जाते. गणेशाच्या दर्शन घेण्यासाठी विविध जातीधर्मांचे लोक येत असतात, त्यांच्या भावना दुखणार नाहीत, याचीही काळजी घेतली जाते," अशी माहिती लेखक, दिग्दर्शक असलेले श्रीमान योगी नाट्य संस्थेचे संस्थापक योगेश शिरोळे यांनी दिली.

"क्रांतिकारी विचार, शंकर पार्वती, मासिक पाळी, गडसंवर्धन ही काळाजी गरज, दुधाची भेसळ, २६/११, सुभाषचंद्र बोस या सारख्या आदी सामाजिक विषयांवर जिवंत देखावे सादर केले जातात. जिवंत देखाव्यांमुळे २० ते २५ मिनिटे ३०० ते ४०० प्रेक्षकांचे प्रबोधन आणि मनोरंजन करता येते. शहरातील मानाची गणेश मंडळे मोठमोठे राजवाडे, मंदिरे, सजावटी करतात. तर काही मंडळे लायटिंग करतात. काही मंडळांकडून अद्यापही हलते देखावे सादर केली जात आहेत. प्रामुख्याने सर्वच मंडळांचा सामाजिक प्रबोधनाचा, संदेश देण्याचा हेतू असतो.

> आता गणेशोत्सवातील देखाव्यांचे स्वरूप बदलत चालले आहे. मात्र, देखाव्यासाठी विषय निवडताना सामाजिक भान ठेवले जाते. गणेशाच्या दर्शन घेण्यासाठी विविध जातीधर्मांचे लोक येत असतात, त्यांच्या भावना दुखणार नाहीत, याचीही काळजी घेतली जाते. स्त्री अत्याचार या विषयावर देखावा सादर केला असून यातून स्त्रीनेच आता स्वत: उभे राहून ते बंड करावे. कोणाच्या मदतीची वाट न पाहता तिनेच आता लढावे, असाही संदेश देण्यात आला आहे.
>
> - योगेश शिरोळे, लेखक-दिग्दर्शक आणि संस्थापक, श्रीमानयोगी नाट्य संस्था.

> साधारपणे २० वर्षांनी गणपती मंडळांचा देखावे सादर करण्याचा ट्रेंड बदलत असतो. पूर्वी हलते देखावे, कारंजे, लाईटिंग, मोठ्या मूर्ती आधीच्या माध्यमातून देखावे सादर केले जायचे. आता जिवंत देखाव्यांचा ट्रेंड सुरू झाला आहे. यात ऐतिहासिक विषयाला आधुनिकतेची जोड दिली जाते. यामुळे नव्या-जुन्या कलाकारांना कला सादर करण्याची संधी मिळत आहे.
>
> - पीयूश शाह, लेखक, दिग्दर्शक, कलाकार.

# पुणे, पिंपरी चिंचवडमध्ये CNG च्या दरात मोठी वाढ

## ऐन गणेशोत्सवात पुणेकरांना मोठा फटका बसला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह परिसरात कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅसच्या किंमतीत ९० पैशांनी वाढ करण्यात आली आहे. याआधी पुण्यात आणि परिसरात सीएनजी प्रतिकिलोसाठी ८५ रुपये द्यावे लागत होते.

आता नागरिकांना सीएनजी प्रतिकिलोसाठी ८५.९० रुपये मोजावे लागणार आहेत. हे नवीन दर आजपासून लागू झाले आहेत. असं असलं तर पीएनजी दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि हिंजवडी या शहरांना सीएनजी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने (एमएनजीएल) आंतरराष्ट्रीय नैसर्गिक वायू बाजारपेठेत वाढत्या किमतीमुळे दरवाढीची घोषणा केली. ही वाढ नाममात्र असली तरी सीएनजीची वाढती मागणी आणि आयात खर्च यामुळे ही वाढ झाली आहे.




सीएनजीच्या किंमतीत वाढ केल्यानंतर एमएनजीएलने म्हटलं आहे की, आजही पारंपारिक इंधनाला कमी खर्चिक पर्याय हा सीएनजीच आहे. पेट्रोलच्या तुलनेत सीएनजीमुळे ४९ टक्के बचत होते. तर डिझेलपेक्षा सीएनजी २७ टक्के स्वस्त आहे. पेट्रोल किंवा डिझेलऐवजी सीएनजी वापरताना रिक्षाचालकांना २९ टक्के बचतीचा फायदाही होतो.

दरम्यान, याआधी जुलैमध्येही सीएनजीच्या किमतीत १.५० रुपये प्रतिकिलोने वाढ झाली होती. यानंतर सीएनजीची किंमत ८५ रुपये प्रतिकिलो झाली होती. सीएनजीच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने पेट्रोल आणि डिझेलला पर्याय म्हणून या पर्यावरणपूरक इंधनाकडे वळलेल्या वाहनचालकांची चिंता वाढली आहे.

# जागेची मालकी बदलली तरी वीजबिल थकबाकी भरणे अनिवार्य

## थकबाकी जागेच्या नवीन मालकाकडून किंवा ताबेदाराकडून वसूल करण्याचा अधिकार महावितरणला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जागेची मालकी बदलली तरी वीजबिलांची थकबाकी भरणे अनिवार्य आहे. ही थकबाकी जागेच्या नवीन मालकाकडून किंवा ताबेदाराकडून वसूल करण्याचा अधिकार महावितरणला आहे. या पार्श्वभूमीवर थकीत वीजबिलामुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेली घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर जागा थकबाकीमुक्त करण्याची संधी महावितरण अभय योजना २०२४ मध्ये उपलब्ध झाली आहे. यात पुणे परिमंडलातील २ लाख ५३ हजार ३७४ वीजग्राहकांना फायदा होणार असून मूळ थकबाकीचा भरणा केल्यास व्याज व विलंब आकाराचे एकूण ७३ कोटी १४ लाख रुपये माफ होणार आहे.



थकबाकीमुळे दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित झालेल्या वीजग्राहकांसाठी महावितरण अभय योजना दि. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत सुरु राहणार आहे. कृषी व सार्वजनिक पाणीपुरवठा योजना वगळून उर्वरित सर्व अकृषक वीजग्राहकांसाठी ही योजना आहे. पुणे परिमंडलातील २ लाख ५३ हजार ३७३ अकृषक ग्राहकांकडे सद्यस्थितीत ४७२ कोटी १४ लाख रुपयांची थकबाकी आहे. यातील मूळ थकबाकीपोटी ३९८ कोटी ९९ लाख रुपयांचा भरणा केल्यास व्याजाचे ६९ कोटी व विलंब आकाराचे ५ कोटी ५ लाख असे एकूण ७४ कोटी ५ लाख रुपये माफ होणार आहेत.

वीजबिलांची थकबाकी असलेल्या एखाद्या जागेची मालकी बदलल्यानंतर देखील नवीन मालक किंवा ताबेदार यांच्याकडून थकबाकीची रक्कम वसूल करण्याचा अधिकार वीज वितरण कंपन्यांना असल्याचे मा. सर्वोच्च न्यायालयाने निकालात स्पष्ट केले आहे. त्यामुळे थकीत वीजबिलांमुळे कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेली जागा थकबाकीमुक्त करण्यासाठी अभय योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी केले आहे.

# गणेशोत्सवासाठी पीएमपीच्या जादा गाड्या

## दहा दिवसांसाठी 790 बसचा ताफा गणेशभक्तांच्या सेवेत तैनात : मार्गांमध्येही गरजेनुसार बदल

**पिंपरी | प्रतिनिधी**

वैभवशाली परंपरा असलेल्या पुण्याच्या गणेशोत्सवाला मोठ्या थाटामाटात सुरुवात झाली आहे. गणेशोत्सवातील सजावट बघण्यासाठी पुणेकरांबरोबर देश-विदेशातून नागरिक येतात. नागरिकांच्या सोयीसाठी रात्रीच्या वेळी जादा बस सोडण्याचे पीएमपीने जाहीर केले आहे. गणेशोत्सवातील दहा दिवसांत ७९० जादा बस रस्त्यावर धावणार आहेत. या दहा दिवसात पीएमपीची बससेवा रात्रभर सुरू राहणार आहे. मात्र, रात्रीच्या सेवेसाठी प्रवाशांना पाच रुपये जादा आकार द्यावा लागणार आहे.

गणेशोत्सव शहरात उपनगरातून व बाहेरगावाहून गणपतीची रोषणाई, सजावट, देखावे पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. याचा विचार करून नागरिकांच्या सेवेसाठी पीएमपी प्रशासनाने जय्यत तयारी केली असून जादा बस सोडण्याचे नियोजन केले आहे. पुण्याचा गौरवशाली गणेशोत्सव पाहण्यासाठी विविध शहर, राज्यांसह परदेशातून भाविक पुण्यात येतात. त्या वेळी शहरातील रस्त्यांवर होणाऱ्या गर्दीमुळे भाविक पीएमपी बसने अधिक प्रवास करतात. त्यामुळे भाविकांना तत्काळ बससेवा मिळावी, यासाठी पीएमपीने नियोजन केले आहे. नऊ, दहा आणि १६ सप्टेंबर रोजी १६८ जादा बसचे नियोजन करण्यात आले आहे. गौरी विसर्जन झाल्यानंतर देखावे पाहण्यासाठी शहरात गणेशभक्तांची मोठी गर्दी होते. उपनगर आणि इतर भागांतून मोठ्या संख्येने गणेश भक्त येतात. त्यांच्या सोयीसाठी ११ ते १५ सप्टेंबर दरम्यान ६२० बस जादा पीएमपीकडून विविध मार्गावर सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

गणेशोत्सवात पीएमपी बसला मोठी गर्दी असते. त्याचा फायदा घेऊन काही प्रवासी विनातिकीट प्रवास करतात. त्याला आळा घालण्यासाठी पीएमपीकडून विभागवार ठिकठिकाणी तपासणीसाठी पथके तैनात केली असल्याची माहिती पीएमपीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

गणेशोत्सवात गणेश भक्तांसाठी जादा बस संचलन करण्यात येणार आहे. तसेच शहरातील मुख्य रस्ते बस वाहतुकीसाठी बंद राहणार असून प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून दिवसभराच्या संचलनामध्ये नेहमीच्या शिवाजीरोड, बाजीराव रोड, लक्ष्मी रोड, टिळक रोड या रस्त्यांवरून संचलनात असलेल्या बसच्या मार्गामध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात येणार आहे, याची प्रवाशांनी नोंद घ्यावी आणि सहकार्य करण्याचे आवाहन पीएमपी प्रशासनाने केले आहे.



### पिंपरी-चिंचवडमधूनही भाविकांची सोय

» गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक पुण्यात जातात. भाविकांची गैरसोय होऊ नये, म्हणून पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत (पीएमपीएल) पिंपरी-चिंचवड शहरातील मुख्य बसस्थानकांवरून रात्रभर बससेवा पुरवण्याचे नियोजन केले आहे. पहिल्या टप्प्यात १६८, तर दुसऱ्या टप्प्यात ६२० अतिरिक्त बस सोडण्यात येतील. यासाठी प्रत्येक स्थानकावर विशेष अधिकारी व कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

### निगडी, चिंचवडगाव, भोसरी, पिंपळे गुरव, निगडी, चिंचवड, भोसरीहून बस

गणेशोत्सव काळात पिंपरी-चिंचवड शहरातून २७० जादा बस सोडण्यात येणार आहेत. यात निगडी येथून ७०, चिंचवडगाव ३५, भोसरी ६२, पिंपळे गुरव २०, सांगवी १५, आकुर्डी रेल्वे स्टेशन १६, चिंचवडगावमार्गे डांगे चौक ३०, मुकाई चौक, रावेत १२ आणि चिखली/संभाजीनगर येथून १० जादा बस सोडण्यात येणार आहेत. सांगवी, आकुर्डी रेल्वे स्टेशन, चिंचवडगावमार्गे डांगे चौक, मुकाई चौक रावेत आणि चिखली/संभाजीनगर या स्थानकांवरून सोडण्यात येणार आहेत.

गणेशोत्सवात नियमित बसच्या फेऱ्या वगळून जादा देण्यात येणाऱ्या फेऱ्या विशेष म्हणून रस्त्यावर असतील. अशा बससाठी रात्री १० नंतर प्रचलित दरामध्ये ५ रुपये जादा दर आकारला जाईल. गणेशोत्सवातील रात्र बससेवा विशेष असल्याने सर्व पासधारकांसाठी रात्री १२ वाजेपर्यंत पास सवलत मान्य असेल. त्यानंतर कुठल्याही प्रकारचे पास चालणार नाहीत.

# दीड दिवसांच्या गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप

## महापालिकेच्या विसर्जन हौदांमध्ये विसर्जन : मूर्तिदानाच्या आवाहनालाही सकारात्मक प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशी भावनिक साद घालून दीड दिवसाच्या गणरायाला भाविकांनी जड अंत:करणाने निरोप दिला. पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध ठिकाणी पुरवण्यात आलेल्या हौदांमध्ये आणि मूर्तिदान केंद्रांमध्ये भाविकांनी स्वतःहून मूर्ती आणून दिल्या. सायंकाळी सात वाजेपर्यंत जवळपास साडेचारशे मूर्ती दान तर, एक टन निर्माल्य गोळा केले होते. दरम्यान, क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत जवळपास ८५ ठिकाणी ही सुविधा करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अनेकांनी परंपरागत वाहत्या पाण्यातही मूर्ती विसर्जित केली. पोलीस आणि महापालिका प्रशासनाचे अधिकारी-कर्मचारी तैनात होते.

शहरातील चिंचवड गावातील मोरया गोसावी, केशवनगर, थेरगाव यांसह पिंपरीतील झुलेलाल घाटावर त्याचप्रमाणे निगडीतील गणेश तलाव, जाधव घाट, किवळे, भोसरी आणि नवी सांगवी या विविध ठिकाणी महापालिकेने योग्य ते नियोजन केले होते. सकाळपासून भाविकांनी या ठिकाणी गणपती विसर्जनासाठी गर्दी केली होती. महापालिकेने आवाहन केल्यानुसार यंदा बहुतांश भाविकांनी शाडूच्या मातीचा वापर असलेल्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली होती. दरम्यान, गणेशमूर्ती विसर्जनासाठी महापालिकेतर्फे व्यवस्था करण्यात आलेली आहे. सर्वच घाटांवर जीवरक्षक तैनात असून, सुरक्षाव्यवस्था ठेवलेली आहे. दीड दिवसांच्या गणरायाला निरोप देण्यासाठीही भाविकांचा उत्साह प्रचंड दिसून आला. ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीने सामूहिकरित्या गणरायाचे विसर्जन करण्यात आले. चिंचवड येथील मोरया घाट, केशवनगर घाट, निगडी व आकुर्डी प्राधिकरणातील भाविकांनी गणेश तलावात; तर रावेत येथील भाविकांनी बास्केट पुलाजवळील घाटावर मूर्तीचे विसर्जन केले. महापालिकेतर्फे घाटांवर कृत्रिम हौदही बांधण्यात आले आहेत. भाविकांनी गणेशमूर्ती विसर्जन हौदांचाही वापर केला. तसेच घाटांवर सामाजिक संस्थाकडून मूर्तिदान उपक्रमही घेण्यात आला. त्याचप्रमाणे मूर्ती उपक्रमात सायंकाळी सात वाजेपर्यंत साडेचारशे मूर्ती दान आल्या होत्या. तर, एक टन निर्माल्य गोळा करण्यात आले.

नागरिकांनीही सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत पालिकेच्या निर्माल्य कुंडात निर्माल्य जमा केले. पोलिसांच्या आवाहनानुसार गणेशभक्तही शांततेत बाप्पांच्या मूर्ती विसर्जनासाठी नेत होते. महापालिकेकडून विसर्जन घाटावर मदत केंद्र व मूर्ती संकलन मंडप उभारण्यात आले आहे. विद्युत दिवे बसविण्यात आले आहेत. घाटावर निर्माल्य कुंड ठेवण्यात आले आहे. घाटावर अग्निशमन दलाचे जवान तैनात करण्यात आले आहे, तर या ठिकाणी सुरक्षेचे साधन ठेवण्यात आले आहे. दीड दिवसाच्या गणेशमूर्ती विसर्जनाच्या दिवशी मूर्तिदानास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



### यंदा कृत्रिम हौदांची संख्या वाढली

» महापालिकेने आवाहन केल्यानुसार कृत्रिम हौदांमध्ये विसर्जन करण्यासाठी भाविकांनी पुढाकार घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे यापूर्वी उभारण्यात आलेल्या सिमेंटच्या हौदासोबतच लोखंडी स्टॅन्ड उभारून त्यात हौद तयार केला होता. त्यात देखील अनेक भाविकांनी मूर्ती विसर्जित केली. यासाठी विशेष अधिकारी देखील नेमण्यात आले होते. पाण्यात उतरून दुर्घटना होऊ नये यासाठी, पोलीस आणि महापालिकेचा अग्निशामक विभागही तैनात होता.

# कैद्यांना मुक्त विद्यापीठातून अर्धवट शिक्षण पूर्ण करण्याची संधी

## नाशिकचे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि महाराष्ट्र कारागृह विभाग यांच्यात नवा सामंजस्य करार

**पुणे | प्रतिनिधी**

कैद्यांना आपले अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी कारागृहातच उच्च शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि महाराष्ट्र कारागृह विभाग यांच्यात नव्याने सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यामुळे कारागृहातील कैद्यांना उच्च शिक्षण पूर्ण करणे शक्य होणार आहे.

कारागृहातून सुटल्यानंतर बंदीवान पुन्हा गुन्हेगारी क्षेत्राकडे न वळता त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी बंद्यांकरिता कारागृह विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यासाठी प्राधान्य दिले जाते. याचाच एक भाग म्हणून कैद्यांना त्यांचे अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी कारागृहातच उच्च शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे व महाराष्ट्र कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक प्रशांत बुरडे, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर, विद्यापीठाचे पुणे विभागाचे सल्लागार डॉ. व्ही. बी. गायकवाड, येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक सुनील ढमाळ, अतिरिक्त अधीक्षक पल्लवी कदम, उपअधीक्षक भाईदास ढोले, रवींद्र गायकवाड, श्रीकांत जावरकर, सोमनाथ पाडुळे आदी उपस्थित होते.



### राज्यातील 10 कारागृहांत अभ्यास केंद्रे

» सद्यस्थितीत येरवडा, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, मुंबई, तळोजा, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या मध्यवर्ती कारागृह व कल्याण जिल्हा कारागृह अशा एकूण १० कारागृहांत विद्यापीठाची अभ्यास केंद्रे आहेत. शैक्षणिक अभ्यासक्रमात मुख्यतः पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच आरोग्यमित्र, योगशिक्षक, बालसंगोपन आणि रंजन शिक्षण, मानवी हक्क, गांधी विचार दर्शन यांसारख्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचा समावेश केला आहे. शिक्षणामुळे कारागृहातील बंद्यांना तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर चांगले जीवन जगण्याची संधी मिळते.

आतापर्यंत मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यातील एकूण २,६४९ पुरुष आणि २०७ महिला अशा एकूण २,८५६ कैद्यांनी पदवी पूर्व परीक्षा, पदविका आणि पदवीचे शिक्षण प्राप्त केलेले आहे. कारागृहात येणारा बंदी हा समाजाचाच एक घटक असतो. परंतु कळत नकळत त्याचे हातून एखादा गुन्हा घडल्यानंतर त्यास कारागृहात शिक्षा भोगण्यासाठी बंदिस्त ठेवण्यात येते. बंदी कारागृहात आल्यानंतर त्याचे अर्धवट शिक्षण पूर्ण करण्यासाठी, कारागृहातच उच्च शिक्षणाची सोय या करारामुळे होणार आहे.

कारागृह विभागाच्या प्रचलित धोरणानुसार कारागृहात राहून मुक्त विद्यापीठामार्फत पदवीचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या बंद्यांना ९० दिवसांपर्यंत शिक्षेत सूट देण्यात येत असून आतापर्यंत एकूण २१४ बंद्यांना प्रत्येकी ९० दिवस या माफीचा लाभ देण्यात आलेला आहे. पदवीधर बंद्यांपैकी एकूण १६ बंद्यांनी उच्च पदवी शिक्षणक्रम पूर्ण केल्याने त्यांना पुन्हा प्रत्येकी ९० दिवसांची माफी देण्यात आलेली आहे.

विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर म्हणाले, "पुरुष व महिला सर्व कैद्यांना उच्च शिक्षण घेण्याची संधी या निमित्ताने उपलब्ध करून देत आहोत. मुक्त विद्यापीठाकडून अभ्यासक्रमाचे साहित्य दिले जाते. परीक्षा केंद्र येरवडा कारागृहात सुरू केले आहे. दरवर्षी पदवीप्रदान सोहळा देखील आयोजित केला जातो."

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे म्हणाले, "सद्यस्थितीत येरवडा, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, मुंबई, तळोजा, ठाणे, औरंगाबाद, नाशिक या मध्यवर्ती कारागृह व कल्याण जिल्हा कारागृह अशा एकूण १० कारागृहांत विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र आहेत. या शिक्षणामुळे कारागृहातील बंद्यांना तुरुंगातून मुक्त झाल्यानंतर चांगले जीवन जगण्याची संधी मिळते."

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक व महाराष्ट्र कारागृह विभाग यांच्यात २०१७ मध्ये सामंजस्य करार केला होता. संबंधित करार नव्याने करण्यात आला आहे. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून राज्यातील २,८५६ बंद्यांनी पदवी पूर्व परीक्षा, पदविका व पदवीचे शिक्षण प्राप्त केले आहे.

शिक्षकदिनाचे औचित्य साधून कारागृहातील बंद्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाची गंगा अविरत सुरू राहावी, या उद्देशाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे व महाराष्ट्र कारागृह विभागाचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक प्रशांत बुरडे यांच्यामध्ये नव्याने बंदी शिक्षणाकरिता सामंजस्य करार केला आहे. करारामुळे राज्यातील सर्व कारागृहांतील जास्तीत जास्त बंद्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहित केले जाणार आहे.


# पुणेकरांनो रक्तदान करा! डेंग्यू, चिकुनगुनिया वाढला

## निरोगी दात्याच्या रक्तातून प्लेटलेट्स काढण्याच्या प्रक्रियेस दोन ते अडीच तास लागतात

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात डेंग्यू आणि चिकुनगुनिया आजारांच्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, त्यामुळे रुग्णांमध्ये प्लेटलेट्सची संख्या कमी होत आहे. सध्या सर्वच रुग्णालयांमध्ये तसेच रक्तपेढ्यांमध्ये प्लेटलेट्सची मागणी वाढली आहे. त्यातच रक्तदान शिबिरे कमी झाल्याने रक्ताची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदानासाठी पुढे येण्याचे आवाहन केले जात आहे.

डेंग्यूची लागण झाल्यास बहुतेकदा रुग्णांमध्ये प्लेटलेट्स देखील कमी होतात. या प्लेटलेट्स ३० हजार ते १० हजार दरम्यान झाल्यास शक्यतो रुग्णांना सलाईनद्वारे प्लेटलेट्स देण्याची गरज पडते. जरी प्रत्येक रुग्णाला प्लेटलेट्सची गरज पडत नसली तरी ती सलाईनद्वारे देण्याची गरज पडू शकते. रक्तदानानंतर रक्ताचे विघटन करून प्लेटलेट्स वेगळ्या केल्या जातात; मात्र प्लेटलेट्सचा साठा पाच दिवसच करता येतो. गेल्या काही दिवसांपासून शहर आणि परिसरात डेंग्यू आणि पावसाळी आजारांच्या रुग्णांचे प्रमाण वाढल्याने मागणी वाढली आहे, त्या तुलनेत रक्तदान होत नसल्याने प्लेटलेट्सचा तुटवडा जाणवत असल्याचे त्यांचे मत आहे.



### प्लेटलेट्सच्या मागणीत 30 ते 35 टक्क्यांनी वाढ

» पावसाळ्याच्या दिवसांमध्ये रक्तदान शिबिरांची संख्या कमी झाली असून १५ ऑगस्टनंतर रक्तदान शिबिरेही हव्या त्या प्रमाणात झालेली नाहीत. रक्त ३५ दिवसांपर्यंत टिकत असले तरी प्लेटलेट्स ५ दिवसांपर्यंतच टिकू शकतात. तसेच, निरोगी दात्याच्या रक्तातून प्लेटलेट्स काढण्याच्या प्रक्रियेस दोन ते अडीच तास लागतात. यावेळी प्लेटलेट्सच्या मागणीत ३० ते ३५ टक्क्यांनी वाढ झाल्याचे रक्तपेढ्यांनी सांगितले.

### का होतात प्लेटलेट्स कमी?

प्लेटलेट्स घटल्यामुळे रक्तस्रावाचा धोका वाढतो. कारण जखम झाल्यावर रक्त वाहत असल्यास त्या ठिकाणी प्लेटलेट जमा होऊन तो रक्तप्रवाह रोखतात; परंतु डेंग्यूच्या विषाणूमुळे रक्ताच्या घटकांचे, विशेषत:, प्लेटलेटचे उत्पादन करणाऱ्या अस्थिमज्जा पेशींचा संसर्ग होऊ शकतो. शरीराची प्रतिकारशक्ती कमी झाल्याने प्लेटलेट्सवर हल्ला होतो. त्यामुळेही संख्या कमी होते. त्यामुळे रक्तप्रवाहातील प्लेटलेट्सची संख्या कमी होते.